॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)


# जनसंपर्क विभाग

जळगाव (दि. ७ ) प्रतिनिधी - कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठच्या 'सेंटर फॉर इनोव्हेशन, इन्क्युबेशन अँड लिंकेजेस' (KCIIL) तर्फे युवा उद्योजकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय 'स्टार्ट अप बूट कॅम्प'ला आज उत्साहात प्रारंभ झाला. ७ ते ९ मे २०२६ दरम्यान आयोजित या बूट कॅम्पमध्ये राज्यभरातून १७ स्टार्टअप फाउंडर्स सहभागी झाले आहेत.

या प्रसंगी कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी सहभागी युवा उद्योजकांशी संवाद साधत त्यांच्या स्टार्टअप आयडिया, व्यवसाय संकल्पना आणि भविष्यातील नियोजनाची माहिती जाणून घेतली. विविध क्षेत्रांतील नवकल्पनांवर आधारित व्यवसाय संकल्पना युवकांकडून मांडण्यात आल्या.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून उद्योजक प्रमोद संचेती, प्रा. रवींद्र पाठक, KCIIL चे संचालक प्रा. अरुण इंगळे, प्रा. भूषण चौधरी, लेखा व वित्त अधिकारी रवींद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी केसीआयआयएल चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. नवीन खंडारे यांनी प्रास्ताविकातून केंद्राच्या कामकाजाचा आढावा घेतला. मागील वर्षभरात स्टार्टअप आणि रोजगार निर्मितीच्या क्षेत्रात केलेल्या उपक्रमांची माहिती देत बूट कॅम्प आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली.

प्रमुख अतिथी प्रमोद संचेती यांनी मार्गदर्शन करताना भारतामध्ये व्यवसायासाठी मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध असल्याचे सांगितले. प्रॉडक्टचे आकर्षक आणि प्रेझेंटेबल पॅकेजिंग, युजर फ्रेंडली डिझाईन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यवसायातील आधुनिकीकरण यावर त्यांनी विशेष भर दिला. शासनाच्या विविध योजना, सवलती आणि व्यवसाय सुरू करण्यापासून ते उत्पादन विक्रीपर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेबाबत त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी आज मोठे उद्योजक केवळ महानगरांतूनच नव्हे, तर लहान शहरांमधूनही पुढे येत असल्याचे सांगितले. केसीआयआयएल च्या माध्यमातून उद्योजकांना त्यांच्या व्यवसाय कल्पनांबाबत आवश्यक मार्गदर्शन व व्यवसाय वृद्धीसाठी मदत केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. यशस्वी व्यवसायासाठी मार्केट रिसर्च, ग्राहकांच्या गरजांचा अभ्यास आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. भविष्यातील गरजा ओळखून व्यवसाय उभारणी करणे काळाची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिकेत पठाडे आणि रोशनी जैन यांनी केले. उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

उद्घाटन सत्रानंतर डॉ. नवीन खंडारे यांनी स्टार्ट अप इकोसिस्टीम साठी संदर्भ निश्चित करणे, डॉ भूषण चौधरी यांनी प्रॉब्लेम फर्स्ट अप्रोच, पेरेंटचे संस्थापक श्रीकांत पाटील यांनी कस्टमर डिस्कवरी सुरुवातीचे ग्राहक ओळखणे आणि युजर पर्सन निश्चित करणे, डॉ. सुहास गजरे यांनी मिनिमम बायबल प्रॉडक्ट कार्यशाळा, तसेच राजेश ठाकरे यांनी लो कोड/ नो कोड साधनांची ओळख या विषयावर मार्गदर्शन केले.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६          दिनांक: ७ मे, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता